## प्रेसनोट

दि. १६/१०/२०२४

**अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे येथील मुख्य लिपीक हिस लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती सुनिता रामकृष्ण माने, वय ४६ वर्ष, पद-मुख्य लिपीक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,६००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १२,६००/- (बारा हजार सहाशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १६/१०/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १६/१०/२०२४ रोजी |
| ठिकाण | प्राथमिक शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे कार्यालयात |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या कायम विना अनुदानित प्रकारच्या दोन शाळा आहेत. त्यात इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षण दिले जाते. तक्रारदार यांच्या वरील दोन्ही शाळेत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आर.टी.ई. (बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क) अंतर्गत प्रवेशित असलेल्या बालकांना २५% टक्के प्रवेश देण्यात आलेला आहे. या प्रवेशाकरीता या बालकांच्या शिक्षणापोटी त्यांची फी ही शासनाकडून शाळांना देण्यात येते. त्यानुसार सन २०२३-२४ कालावधीत तक्रारदारांच्या दोन्ही शाळेत आर.टी.ई. अंतर्गत २५% प्रवेश दिलेल्या बालकांची फी एकुण १२,६९,१४१/- रुपये तक्रारदारास शासनाकडून येणे बाकी होते. सदरबाबत मा. उच्च न्यायालयाने शासनास आठ आठवडयाच्या आतमध्ये सदरची रक्कम संबंधीत संस्था चालकास (तक्रारदारास) अदा करणेबाबत ऑगस्ट २०२४ मध्ये आदेश दिला होता. त्याप्रमाणे शासनाने माहे सप्टेंबर २०२४ मध्ये रक्कमही रिलीज केली होती. सदर रक्कम तक्रारदार यांना अदा करण्याबाबतचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. नाशिक यांना आदेश काढण्याकरीता लोकसेवक श्रीमती सुनिता माने यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना मिळणा-या १२,६९,१४१/- या रकमेच्या १% म्हणजे १२,६००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक सुनिता माने यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी १२,६००/- रुपयांची लाच मागणी करुन, ती लाचेची रक्कम १२,६००/- (बारा हजार सहाशे रुपये) तक्रारदाराकडून पंचासमक्ष प्राथमिक शिक्षण संचालनालय कार्यालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे येथे स्विकारले असता लोकसेवक श्रीमती सुनिता माने यांना ताब्यात घेण्यात आलेले असून, त्यांचेविरुद्ध बंडगार्डन पो. स्टेशन, पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक अनिल कटके तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

16/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner